**कृषि उन्नती योजनेंतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानामधील बियाणे घटकांतर्गत बियाणे गुणवत्ता नियंत्रण घटकांचे बळकटीकरण या १०० टक्के केंद्र पुरस्कृत घटकांसाठी निधी वितरीत करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : कृवपदुम १२०२७/४४/२०२६- MAG-1A**

**संगणक क्रमांक : १६४२२४०**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, विस्तार, मुंबई- ४०००३२

दिनांक : २६ मे, २०२६

वाचा:-

१) केंद्र शासनाचे पत्र क्र.२-३३/२०२४-NFSNM, दि.१६.०४.२०२५

२) ४२ व्या SLSC मिटींगचे इतिवृत्त No.CSS-२०२६/C.R. १९/2A, दि.११.०३.२०२६

३) केंद्र शासनाचे पत्र F. No. १९ (MH ६६४), दि.२३.०४.२०२६

४) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६

५) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०७.०५.२०२६

६) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय कृवपदुम-१२०२७ /४४/२०२६-MAG-1A, (E-१६४२२४०) दि. ११.०५.२०२६ (प्रशासकीय मान्यता)

**प्रस्तावना :-**

कृषि उन्नती योजना राष्ट्रीय अन्न व सुरक्षा व पोषण अभियानामधील बियाणे घटकांतर्गत १००% केंद्र पुरस्कृत उपघटकांसाठी रू.२४९४.९४ लाख रकमेच्या वार्षिक कृती आराखड्यास वाचा क्र. ६ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर योजना १००% केंद्र हिस्सा या प्रमाणात राबविण्यात येते.

२. केंद्र शासनाने वाचा क्र. ३ येथील पत्रान्वये सन २०२६-२७ मध्ये कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान अंतर्गत बियाणे घटकांतर्गत बियाणे गुणवत्ता नियंत्रण घटकांचे बळकटीकरण या १००% केंद्र पुरस्कृत उपघटकांसाठी पहिला हप्ता उपलब्ध करून दिला आहे. सदर केंद्र हिश्श्याचा निधी रू. ४,६१,६२,५००/- (रूपये चार कोटी एकसष्ट लक्ष बासष्ट हजार पाचशे फक्त) कृषि आयुक्तालयास वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

कृषि उन्नती योजना - अन्न सुरक्षा व पोषण अभियान अंतर्गत बियाणे घटकांतर्गत बियाणे गुणवत्ता नियंत्रण घटकांचे बळकटीकरण हा १००% केंद्र पुरस्कृत उपघटक सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये राबविण्यासाठी पहिल्या हप्त्याचा केंद्र हिश्श्याचा रु. ४,६१,६२,५००/- (रुपये चार कोटी एकसष्ट लक्ष बासष्ट हजार पाचशे फक्त) इतका निधी कृषि आयुक्तालयास वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२ . उपरोक्त खर्च चालू सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यासाठी खालील लेखाशिर्षांतर्गत खर्ची टाकण्यात येत आहे.

| योजनेचे नाव | लेखाशिर्ष (मराठी) | Budget head (English) |
|---|---|---|
| बियाणे गुणवत्ता नियंत्रण घटकांचे बळकटीकरण | मागणी क्र. डी -३<br>२४०१- पीक संवर्धन<br>(००)<br>१०३-बियाणे<br>(००)(३१) कृषि उन्नती योजना - बियाणे गुणवत्ता नियंत्रण घटकांचे बळकटीकरण (केंद्र हिस्सा १०० टक्के) (केंद्र पुरस्कृत योजना ) ( योजना )<br>(२४०१ बी ६६२ )<br>३३, अर्थसहाय्य | Demand No. D-3<br>2401- Crop Husbandry<br>(00)<br>103-Seeds<br>(00)(31) Krishi unnati Yojana-Strengthening of Seed Quality Control Components (Central Share 100 %) (Centrally Sponsored Scheme) (Scheme)<br>(2401B 662)<br>33, Subsidies |

३. सदर योजना राबविताना खालील अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे-

१. सदर योजना केंद्र शासनाच्या संदर्भाधिन/अन्य मार्गदर्शक सुचनानुसार व केंद्र शासनाच्या निधी वितरीत करण्याच्या अटी व शर्ती नुसार राबविण्यात यावी.

२. खर्चाचे लेखे सुव्यवस्थित ठेवून सदर खर्चाचे लेखा परिक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे केंद्र व राज्य शासनाला लवकरात लवकर प्रगती अहवालासह सादर करण्यात यावेत. योजनेच्या वेगवेगळ्या बाबींवरील भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल केंद्र व राज्य शासनास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करण्यात यावा.

३. योजनेशी संबंधित ताळेबंद व लेखापरिक्षण जमा खर्चाच्या रकमा यांचा अहवाल अंमलबजावणी यंत्रणेने द्यावा. त्यामध्ये वर्षाच्या सुरूवातीला अखर्चीत रकमा व व्याजाद्वारे मिळालेले उत्पन्न स्पष्टपणे नमूद करण्यात यावे. जेणेकरून पारदर्शी स्वरूपात रकमा विचारात घेता येतील व संदिग्धता राहणार नाही.

४. कोणत्याही परिस्थितीत मंजूर कार्यक्रमापेक्षा जास्तीचा कार्यक्रम राबविला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

५. सदर निधी खर्च करताना विहित कार्यपद्धती अनुसरून सर्व वित्तीय कायदे /टेंडर नियमावली व नियमांचे /प्रक्रियेचे /वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत /P.W.D /मॅन्युअलचे अधिन राहून /C.V.C.तत्वानुसार /CAG च्या निर्देशानुसार/प्रचलित शासन निर्णय/नियम/परिपत्रक/ तरतुदी नुसार, बजेट व कोषागार नियमावली नुसार खर्च करण्याची कार्यवाही अमंलबजावणी

यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहील.

६. वेळोवेळी शासन निर्णयान्वये वितरीत केलेला सर्व निधी सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीमधील SNA प्रणालीव्दारे वितरीत करण्याची कार्यपध्दती बंधनकारक राहील.

७. वाचा क्र. ३ येथील केंद्र शासनाच्या पत्रात नमूद केलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

४. सदर योजनेकरीता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणून व त्यांच्या कार्यालयातील सहायक संचालक, लेखा यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर निधी खर्च करतांना विहित कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे/ टेंडर नियामावली व नियमांचे /प्रक्रियेचे /वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत /P.W.D. मॅन्युअलच्या अधिन राहून / C.V.C.तत्वानूसार /CAG च्या निर्देशानुसार /प्रचलित शासन निर्णय /नियम /परिपत्रक / तरतुदीनुसार, बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अंमलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन निर्णय/अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहिल.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०७.०५.२०२६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२६०५२६१३३८३१०८०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUHAS MADHUSUDAN SAKPAL

Digitally signed by SUHAS MADHUSUDAN SAKPAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=01592dd98f36fbc924826517361a31b8166fce7745d35b95fa79159b8fb74478, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=82434617B1F4C6035B3CC29788B8D394A52FB3EDABFC26B4E85EBC2AF7C45FF9, cn=SUHAS MADHUSUDAN SAKPAL
Date: 2026.05.26 13:39:31 +05'30'

**( सुहास सकपाळ )**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति :**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
४. मा. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. संचालक (नि.व गु.नि.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

७. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर .
८. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
१०. सर्व प्रकल्प संचालक, आत्मा.
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१२. सहाय्यक संचालक, लेखा -१, कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. कार्यासन १४३१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई.
१५. निवडनस्ती (कार्यासन १-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.